जिल्हा परिषद ठाणे,धुळे,नाशिक व नंदुरबार यांच्या अधिपत्याखालील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ब च्या एकुण ९ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१८/प्रक्र-१७२ /आरोग्य ३(अ)

गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०२ मे,२०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः अपदे २०१७/प्रक्र-१५४/आरोग्य ३(अ), दि.८.२.२०१८.

२) सहसंचालक (प्रा.आ.कें/उपकेंद्र/दवाखाने), आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/कक्ष७ अ/ टे-८/जिप/ठाणे, धुळे, नाशिक व नंदुरबार/ अस्थाईपदे/चालू ठेवणे/१८४१-४२/१८, दि.२३.४.२०१८.

३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः पदनि २०१६/प्रक्र-८/१६/आ.पु.क. दि.०५.०३.२०१८.

शासन निर्णय:-

संदर्भाधीन क्र.१ येथील शासननिर्णयान्वये जिल्हा परिषद ठाणे,धुळे,नाशिक व नंदुरबार यांच्या अधिपत्याखालील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी वर्ग-२ ब च्या एकुण ९ अस्थायी पदाना दि.१.१.२०१८ दि.२८.२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन सदर पदांना दि.१.०३.२०१८ ते दि.३०.९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर ९ अस्थायी पदाना शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्रक्र-८/१६/आ.पु.क दिनांक ०५.०३.२०१८ मधील अटीच्या अधीन राहून दिनांक १.३.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर पदांवरील खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-१९ या वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात यावा.

मागणी क्रमांक आर-३

२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ -सार्वजनिक आरोग्य
००१- संचालन व प्रशासन
००१-(४)- गट वैद्यकीय अधिकारी
(२२१० ०३७१)

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६ / प्र.क्र. ८/ १६ / आ.पु.क.दि.५.३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०२११४०४६५२१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.05.02 13:53:47 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय ग्रामीण अभियान, मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
३. सहसंचालक आरोग्य सेवा (प्रा.आ.केंद्र/ उपकेंद्र / दवाखाने), मुंबई
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप,हत्तीरोग व जलजन्य आजार),पुणे
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे,नाशिक
७. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय,ठाणे/नाशिक/धुळे/नंदुरबार
८. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे/नाशिक/धुळे/नंदुरबार
९. जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/नाशिक/धुळे/नंदुरबार
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व लेखापरिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
११. वित्त विभाग (व्यय १३)/वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई
१२. अवर सचिव/कक्ष अधिकारी (सेवा-२, सेवा-३, सेवा-५, अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवडनस्ती.

विवरणपत्र

जिल्हा परिषदेच्या (ठाणे, नाशिक, धुळे व नंदूरबार) अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्र येथील अस्थाई पदे दि.१.३.२०१८ ते ३०.९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवणेबाबत.

अ. क्र.	पदनिर्मितीचा शासन निर्णय, क्रमांक व दिनांक	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी	ज्या शासकीय आदेशान्वये पदे चालू ठेवली त्याचा क्रमांक व दिनांक	लेखाशिर्ष
१	शासन निर्णय क्र.पीएचसी २००३/ प्र.क्र.२६१/ आरोग्य-५, दि.२८.७.२००४	वैद्यकीय अधिकारी (प्रा.आ.कें.वाकवाड)	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००	सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.अपदे २०१७/ प्र.क्र.१५४/ आरोग्य-३अ, दि.८.२.२०१८	**<u>मागणी क्रमांक आर-१</u>** २२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६- सार्वजनिक आरोग्य सेवा (०१) - संचालन व प्रशासन ००१ (०४) गट वैद्यकीय अधिकारी (२२१० ०३७१)
२		वैद्यकीय अधिकारी (आंबोले व कपालेश्वर)	२	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००		
३		वैद्यकीय अधिकारी (लहान शहादा)	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००		
४		वैद्यकीय अधिकारी (तलासरी - मलावाडा, खोडाळा)	३	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००		
५	शा.नि.क्र.संकीर्ण १००/३१०/प्र.क्र. २६१/आ.५, दि.१७.१.०५	वैद्यकीय अधिकारी (मुरबाड -शिरोशी)	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००		
६	शा.नि.क्र.पीएचसी २००२/२००३/प्र.क्र. २६१/आरोग्य-५, दि.१७.७.२००६	वैद्यकीय अधिकारी (मुरबाड-तुळई)	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००		
	एकूण		९			